# विनोबा-वार्ता

दैनिक साम्ययोग

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ११९ ) वर्धा, मंगळवार ता. ४ ऑगस्ट १९६४ ( मूल्य ५ न.पै.


## महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचे शिबिर सुरू झाले.

### दोनशे कार्यकर्ते शिबिरात दाखल

श्री. ढेबरभाई ह्यांनी ता० ३ ऑगस्टला सेवाग्राम येथील महादेवभाई हॉलमध्ये रचनात्मक कार्यकर्त्यांच्या शिबीराचे उद्घाटन सकाळी १०॥ वाजता केले. ह्या शिबिराला आतापर्यंत दोनशे कार्यकर्ते आलेले आहेत.

# गांवच्या नवनिर्माणाचे प्रश्न व त्यांच्या सोडवणुकीचा मार्ग

( श्री. श्रीमन्नारायण अग्रवाल, सभासद, नियोजन मंडळ )

तिसऱ्या योजनेत भूमिहीन शेतकऱ्यांचा व शेतमजुरांच्या कामावर पुष्कळ भर देण्यात आला होता. त्याचबरोबर भूदान व ग्रामदानात मिळालेल्या जमिनीचा पूर्ण उपयोग करून घेण्याच्या सूचनाहि देण्यात आल्या होत्या. ह्या दृष्टीने शेतीला लायक जमिनीची आधी सर्वे करण्यात यावी व भूमिहीनांना बसविण्यासाठी निवडक क्षेत्रे पसंत करण्यात यावी असे हि ठरविण्यात आले होते.

भारत सरकार तर्फ २५० किंवा अधिक एकर अशा मोठ्या तुकड्यांच्या जमिनीचा सर्वे करण्यासाठी एक समिती बनविण्यात आली होती व ह्याच समितीला पंडित जमिनीबद्दलच्या योजना करण्याचे सांगण्यात आले होते. ह्या समितीने १२ प्रदेश सरकारशी संबंध जोडून आपला अहवाल सादर केला आहे. त्यात १६०८ कोट रुपयांच्या खर्चाने १०-८ लाख एकर जमिन शेतीलायक करता येईल अशी शिफारस करण्यात आली आहे. ह्या समितीच्या कामाला पूरक म्हणून २५० एकरांहून लहान असलेल्या तुकड्यासाठीहि ६९ लाख रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. हे काम १३ प्रदेशांच्या १५० जिल्ह्यात सुरू करण्यात आले आहे.

शेत मजुरासाठी जमीन प्राप्त करण्याच्या व त्याच्या पुनर्वसनाच्या कामासाठी १२ प्रांतात कार्यक्रम तयार करण्यात आलेले आहेत. ह्या कार्यक्रमाप्रमाणे ८५००० भूमिहीन कुटुंबांना बसविण्याची योजना पूर्ण झालेली आहे. १९६३-६४ च्या अंदाज पत्रकात अशा योजनासाठी केन्द्रसरकारने १२ लाख रुपयांची मदत हि दिलेली आहे. पण हे सर्वेच्याच पुनर्वसनाच्या कामात फार सावकाश प्रगति होत आहे. ह्या कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेऊन प्रादेशिक सरकारांनी त्याचा जलद अंमल करण्यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे.

### ग्रामदानाचा प्रभाव

आचार्य विनोबा भावे ह्यांच्या भूदान-ग्रामदान आंदोलनात स्वेच्छापूर्वक प्रयत्नांनी पुष्कळ यश प्राप्त झालेले आहे. भूदानाची जवळ जवळ १० लाख एकर जमीन भूमिहीन शेतमजुरांत वाटली गेलेली आहे. त्यामानाने प्रदेश सरकाराकडून भूमि सुधारणा विषयक कायद्याचा अंमल जलद झालेला नाही. त्याचप्रमाणे भूमिहीनांना वाटण्यासाठी सरकार किती जमीन देऊ शकेल ह्याचा अंदाज नीट लागलेला नाही. पण केंन्द्रीय सरकारने एकरी रु. १५० ह्या प्रमाणांत पडित जमीन उठविण्यासाठी ७ कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविले आहे. आणि आरंभीचा खर्च म्हणून कुटंबामागे रु० ५०० मंजूर करून ठेवले आहेत. ज्यांना भूदानाची जमीन मिळालेली नसेल अशा भूमिहीन मजुरांना वरील योजनान्वये मदत पोंचविण्याच्या कामाला प्राथमिकता मिळाल्यास ते उपयुक्त ठरेल.

आचार्य विनोबांच्या प्रेरणेने ग्रामदान आंदोलन संख्या व गुण दोहों दृष्टींनी गतिपूर्वक पुढे चालले आहे. ५८०० गावे ( नव्हे सध्या ७००० ) ग्रामदानात मिळाली आहेत. ही गावे केवळ आदिवासी गावे नाहीत, तर ज्या गावांची जमीन सुपीक आहेंत व ज्यात प्रगतिशील शेतकरी आहेत अशी हि गावे आहेत; हे मोठे आशास्पद चिन्ह आहे. ह्यावरून ग्रामदान चळवळीची मुळें खोल रुजत चालली आहेत असे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे भारताच्या खेडेगावच्या पुनर्निमाणांच्या प्रश्नावर ग्रामदानाचा प्रभाव पडत आहे.

### आपल्या ग्राम-पंचायती व सहकारी पद्धति

तिसऱ्या योजनेचे जे मध्यंतरीचे मूल्यांकन करण्यात आले, त्यावरून असे दिसून आले की शेती उत्पादन व गरीब मजुरांची सामाजिक व आर्थिक स्थिति ह्यांच्या वाढीच्या व सुधारण्याच्या दृष्टीनें प्रयत्न केले गेले तरी त्यात विशेष यश मिळाले नाही. भूमिहीन शेतमजुरांची स्थिति अजून हि चिंताजनक आहे. त्याचप्रमाणे पंचायती राज्य व सहकारी चळवळ ह्यांच्या कारणानें खेडेगावात जें संस्थात्मक परिवर्तन झाले आहे, त्यामुळें हि अजून आर्थिक उन्नतीला पाहिजे तशी गति मिळालेली नाही. पंचायत राज्याच्या मागे हेतु असा आहे की उत्पादनाची वाढ होऊन आर्थिक प्रगतीला ग्रामजनतेच्या सक्रिय सहकार्याने चांगली गति मिळावी. ह्या नूतन ग्रामसंस्थामुळे गावच्या लोकात नवीन चेतना व जबाबदारीचे भान निर्माण करण्यास मदत झाली आहे. पण त्याचबरोबर पुष्कळ ठिकाणी निवडणुकीमुळे निर्माण झालेल्या मनोमालिन्याने व भांडणामुळे ऐक्याला धक्का हि पोचला आहे. लहान लहान शेतकऱ्यांनी वैज्ञानिक साधने एकत्र करून सहकार्याने वापरावी ह्या बाबतीत हि सहकारी चळवळ विशेष यश मिळवू शकले नाही. बेकारी व अर्धबेकारीचा प्रश्न अजून हि तसाच शिल्लक आहे. अजून ती नाहीशी करण्याचा समाधानकारक मार्ग सांपडलेला नाही.

### गावांच्या पुनर्निर्माणाचा नूतन मार्ग

ह्याच्या उलट ग्रामदान चळवळीने हे सिद्ध झालेले आहे की लोकात स्वावलंबनाची व आपल्या पायावर उभे राहण्याची नवी भावना निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे सर्व समाजाच्या उन्नतिसाठी गाववाले आपल्या जमिनीचे व साधनाचे इच्छापूर्वक एकत्रीकरण सुद्धा करू शकतात. ग्रामदानी गांवातील बहुतेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीची मालकी ग्रामसमुदायाला देऊन टाकली आहे. आणी ह्यामुळे उत्पादनाची वैज्ञानिक व अधिक न्यायपूर्ण योजना करणे ग्रामसभेला शक्य झाले आहे. त्याचप्रमाणे भूमिहीन शेत-मजुरांना जमिनी व बेकारांना रोजी रविण्याची जबाबदारी ग्रामसभेने उचलावी अशी अपेक्षा आहे. ग्रामवासी आपल्या वार्षिक उत्पादनाचा अमुक एक हिस्सा ग्रामसभेला राजीखुषीने देत आहेत. त्यामुळे ग्रामोद्योग, दूधयोजना व अन्य आर्थिक योजनाहि कार्यक्रम अंगावर घेणारे एक मंडळ तयार होत आहे. गावच्या वयात आलेल्या सर्व लोकांची ग्रामसभा बनते. व ती सर्व संमतीने आपले कार्यकारी मंडळ बनविते. ह्यामुळे परस्परात बेबनाव करणारा निवडणुकांमुळे येणारा

( पृष्ठ २ वर )

www.vinoba.in

